जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक ३११ दिनांक ०४/११/२०२१

# बनावट पॅनकार्ड बनवुन शासनाची फसवणुक करणाऱ्या आरोपीतास मुदेदमलासह अटक- दहशतवाद विरोधी कक्षाची कामगिरी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील दहशतवाद विरोधी कक्षाला गुप्त बातमीदारा मार्फत माहिती प्राप्त झाली की, वालीव पोलीस ठाणेचे हद्दीत श्री फोटो स्टुडिओ शॉप नं.१, मौर्यानाका, सातीवली वसई पुर्व, ता. वसई, जि पालघर येथे आरोपीत नामे सत्यप्रकाश हिरालाल मौर्या, वय-२९ वर्षे, हा कोणतेही वैध कागदपत्र नसताना नागरिकांकडुन १०००/- रुपये रक्कम स्विकारुन बनावट पॅनकार्ड बनवुन शासनाची फसवणुक करीत आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या अनुषंगाने दहशतवाद विरोधी कक्षाने सदर ठिकाणी छापा कारवाई केली असता १८ बनावट पॅनकार्ड, ०१ लॅपटॉप, ०१प्रिंटर, लॅमिनेशन मशीन व इतर कागदपत्रे असा मुदेदमाल मिळून आल्याने तो जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीता विरुध्द वालीव पोलीस ठाणे येथे गु. रजि. नं - १२५४/ २०२१ भा. दं. वि. स. कलम ४२०,४६५,४६७ प्रमाणे दिनांक दि. ०३/११/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे जर कोणी वैध कागदपत्रांशिवाय पॅनकार्ड बनवून देत असल्यास आपले नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा.

सदरची कामगिरी श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पो.हवा. अशोक कोकाटे, विजय विचारे, पो.ना. धिरज राणे, तुषार भुरकुडे यांनी पार पाडली आहे.

------oo------